## प्रकरण सहावे :-

# "उपसंहार"

## : प्रकरण सहावे :

इचलकरंजीतील दलित मागधारकांच्या व कामगारांच्या आर्थिक व राजकीय विकासाविषयी माहिती घेत असतांना त्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सरंजामशाहीच्या काळात दलित समाज गुलामगिरीचे जीवन जगत होता. बलुतेदार बनून समाजाची सेवा करीत होता. त्यावेळी दलितांची स्वत:ची अशी कोणतीच मालमत्ता नव्हती. आर्थिक दृष्टया दलित सर्वस्वी परावलंबी होते. दलितांचा सामाजिक दर्जा अतीशय कनिष्ठ स्तरातील होता. अस्पृश्य समजून त्यांना गांवाबाहेर ठेवले जात होते. समाजामध्ये त्यांना विशेष स्थान नव्हते. ग्रामसेवा त्यांच्याकडून सक्तीने करून घेतल्या जात असत.

दलित समाज हा भारतातील राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक दृष्टया अतीशय मागासलेला समाज आहे. त्या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी महाराष्ट्रातील अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. महात्मा फुले यांचे दलितोध्दाराचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यानंतर राजर्षि शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांची सरंजामी गुलामगिरीतून मुक्ती व्हावी असे प्रयत्न केले.

स्वातंत्र्यानंतर शासनाने दलितांचा विकास व्हावा म्हणून वेगवेगळया योजना आखल्या. राज्यघटनेतही समतेचा पुरस्कार करून अस्पृश्यता कायद्याने नष्ट केली. तरीही शासकीय योजनांपासून बहुसंख्य दलित वंचित राहिले. यानंतर ग्रामिण अर्थरचनेतच बदल घडून आले. त्यामुळे अनेक भूमिहीन शेतमजूर निर्माण झाले. या काळात औद्योगिकरणाची वाढ झाल्यामुळे शहरांच्या रचनेतही बदल होत गेला, विकास होत गेला.

त्यामुळे स्वतःची कोणतीही उत्पादन साधने नसलेले शेतमजूर उद्योगधंद्यांकडे आकृष्ट झाले आणि शहरातील कारखान्यांमधून ते काम करू लागले. ज्या शहरांची औद्योगिक वाढ झपाट्याने झाली अशा शहरांमध्ये इचलकरंजीचा समावेश होतो. येथील संस्थानिकांनी वस्त्रोद्योगाला चालना दिली. त्यामुळे हे शहर महाराष्ट्राचे मँचेस्टर म्हणून उदयास आलेले दिसते. सुरुवातीला कोष्टी लोक जुन्या हातमागावर कापड विणण्याचे काम करीत असत.

परंतु यंत्रमागाचा विकास झाल्यानंतर हा व्यवसाय कोणत्याही एका जातीचा न राहता तो सर्व धर्मांच्या व जातींच्या लोकांचा व्यवसाय झाला. त्यामुळे दलितांनाही या उद्योगामध्ये पदार्पण करता आले. दलितांनी आपला पारंपारिक व्यवसाय सोडून यंत्रमाग व्यवसायात प्रवेश केलेला दिसतो. सुरुवातीला दलितांनी कामगार म्हणून हातमाग व्यवसायात काम केले. या व्यवसायात साडीचे उत्पादन होत होते. हातमागाची संख्या कमी होत जाऊन यंत्रमागांची संख्या वाढली. त्यामुळे दलित कामगार यंत्रमागावरील कामगार बनले.

प्रस्तुतच्या अभ्यासातून खालील निष्कर्ष निघतात.

१) पाहणी केलेल्या दलित उद्योजकांतून असे आढळून आले की, बहुतेक दलितांनी आपले पारंपारिक व्यवसाय सोडून आधुनिक भांडवली समाजातील यंत्रमागासारखे आधुनिक व्यवसाय स्विकारले आहेत. म्हणजे पारंपारिक आर्थिक दर्जामध्ये बदल झालेला दिसून येतो. त्याचबरोबर पाहणीतून हे लक्षात आले की, दलित समाजातील केवळ महार जातीने यंत्रमागासारखा नवीन उद्योग, स्विकारला. त्याचे कारण म्हणजे त्यांचा पारंपारिक व्यवसाय

जास्त प्रमाणात

कसबी स्वरूपाचा नव्हता. आणि त्याचबरोबर वाढती लोकसंख्या व वाढती बेकारी यामुळे त्यांना नवीन उपजीविकेची साधने शोधणे भाग पडले. त्यांच्या तुलनेत मांग व चांभार या जातीचे पारंपारिक व्यवसाय कसबी स्वरूपाचे आहेत त्यामुळे त्या जातींचे प्रमाण यंत्रमाग धंद्यात कमी असलेले आढळते.

२] यंत्रमागातील दलित उद्योजक व कामगार यांच्या पाहणीतून असे दिसून आले की, त्यांची फारशी आर्थिक प्रगती झालेली नाही. दलित उद्योजकांमध्ये काम करणा-या दलित कामगारांची परिस्थिती इतर कामगारांप्रमाणेच वाईट आहे. दलित उद्योजक दलित कामगाराला तो आपल्या जातीचा आहे म्हणून कांही सवलती देत नाही. दलित - कामगारांचे प्रश्न इतर कामगारांच्या प्रश्नासारखेच भिजत पडलेले आहेत.

दलितांचा विकास जलद गतीने होत नाही. कारण त्यांच्या विकासाची वाढ नागमोडी वळणाची आहे. त्यामुळे दलितांचा विकास संथ गतीने होतांना दिसतो. त्याचबरोबर हेही महत्त्वाचे आहे की, यंत्रमाग उद्योगातील दलितांसाठी शासनाच्या कोणत्याही योजना किंवा तरतुदी नाहीत.

३] आम्ही केलेल्या पाहणीतून असे लक्षात आले की, दलित कामगार या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने कार्यरत असलेल्या [सी.आय.टी.यू.] मध्यवर्ती कामगार संघटना या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कामगार संघटनेकडे जास्त आकर्षित झालेला नाही. कारण त्याला दलित यंत्रमागधारक जातीच्या नांवावरून मार्क्सवादी संघटनेपासून परावृत्त करतात. येथे

दलित यंत्रमागधारक जातीचे राजकारण करतांना दिसतो. त्यामुळे दलित कामगारांचा राजकीय सहभाग होत नाही. कारण कामगार संघटनेतील त्यांचे प्रमाण अल्प आहे. याचा परिणाम म्हणून संघटनेशिवाय दलित कामगारांचे प्रश्न सुटू शकलेले नाहीत.

दलित कामगार निवडणुकीमध्ये पाठिंबा देतांना काँग्रेस आयला पाठिंबा देतो. कारण काँग्रेस आय पक्षामध्ये दलित यंत्रमागधारक आहे.

४] दलित यंत्रमागधारकांच्या अभ्यासावरून असे लक्षात आले की, दलित यंत्रमागधारकांचा पाठिंबा इंदिरा काँग्रेस या राजकीय पक्षाला आहे. ते ज्याप्रमाणे वस्त्रोद्योगाच्या विकासासाठी इतर यंत्रमागधारकांबरोबर उभे राहतात, लढा देतात त्याचप्रमाणे कामगारविरोधी धोरणाशि एकजुटीने उभे राहतात. त्यावेळी ते दलित कामगारांचा वेगळा विचार करीत नाहीत. येथे त्यांचे राजकारण जाती चे ऋणानुबंध छेदून पुढे जाते. दलित यंत्रमागधारक व दलित कामगार एकत्र येऊन वस्त्रोद्योग धोरणाला विरोध करतांना दिसतात.

एकंदरीत आमच्या असे लक्षात आले की, दलित उद्योजकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ आहे. उदा.इंदिरा काँग्रेस पक्ष, इचलकरंजी पॉवरलूम विव्हर्स को-ऑप.असोसिएशन इ. परंतु दलित कामगारांना कोणतेही व्यासपीठ मिळत नाही.

-=[o]=-

B+
R ...
1/3/90

## -: संदर्भ सूची :-

ग्रंथ :-


| | | |
|---|---|---|
| १] | कॉम्पबेल जे. एम्. | : बॉम्बे गॅझिटर, रिवाईज्ड एडीशन बॉम्बे १९६०. |
| २] | ताम्हणकर ना. धों. | : "श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे चरित्र १९५१" |
| ३] | फ्रॅक्स एच्. जी. | : "दि स्टोरी ऑफ इचलकरंजी" दि स्कॉटीश मिशन इंडस्ट्रीज कंपनी लिमिटेड पुणा, १९२९. |
| ४] | "ऐसी अक्षरे" | : स्मरणिका, "५० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन" १९७६. |
| ५] | श्री. अवचट अनिल | : "धागे आडवे-उभे" मॅजिस्टीक प्रकाशन, मुंबई. |
| ६] | अत्रे त्र्यंबक नारायण | : "गांव-गाडा," ह. वि. मोटे प्रकाशन, १९५९. |
| ७] | कोल्हापूर जिल्हा गॅझिटर | : १९६१, महाराष्ट्र सरकार, मुंबई. |
| ८] | श्री. गारे गोविंद आणि लिमये [शि] | : "दलितांची आर्थिक व सामाजिक पहाणी" |
| ९] | श्री. गारे गोविंद आणि लिमये [शि] | : "महाराष्ट्रातील दलित: शोध आणि बोध" |
| १०] | जगजीवनराम | : "भारत में जातीवाद और हरिजन समस्या" राजपाल ॲन्ड सन्स, काश्मिरी गेट, दिल्ली, १९८१. |

प्रबंध :-

१] श्री. पाटील आर.बी. - "इचलकरंजीतील औद्योगिक कामगार" "एक समाजशास्त्रीय अभ्यास" पी.एच्.डी.पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध, १९८२

२] श्री. जाधव ए.के. - "इचलकरंजीतील कामगार चळवळ" एम्.फिल.पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध, १९८५.

३] श्री. राजगे ए.बी. - "इचलकरंजीतील विकेंद्रित यंत्रमाग उद्योगाच्या समस्या व उपाय". एम्.फिल.पदवीसाठी शिवाजी विद्यापीठाला सादर केलेला प्रबंध, १९८८.

वर्तमानपत्रे :-

१] दै. सकाळ - नूतन वास्तू-प्रवेश विशेष पुरवणी ८ जून १९८८.

२] दै. सकाळ - २५ जून १९८८

३] दै. सकाळ - २७ जून १९८८.

-=[o]=-